॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++' grade

## कुलगुरूंचे कार्यालय (Office of the Vice-Chancellor)

**Phone:** (02462) 215282 **Website:** www.srtmun.ac.in **E-mail:** vcoffice@srtmu.ac.in

जा.क्र. कुका./०१/अ.म.नामनिर्देशन/२०२२–२३/263 दिनांक १९ डिसेंबर २०२२

### जाहीर सूचना

### विविध अभ्यासमंडळावर करावयाच्या नामनिर्देशनाबाबत

या जाहीर सूचनेद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४०(२)(ख) तरतुदीनुसार विविध अभ्यासमंडळावर नामनिर्देशन करण्याची प्रक्रिया सुरू करावयाची आहे.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४०(२)(ख) ची तरतुद खालीलप्रमाणे आहे :**

**कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून, किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेले पुढील प्रवर्गामधून नामनिर्देशित केलेले सहा अध्यापक :—**

(एक) संबंधित विषयातील विद्यापीठ विभागाच्या पूर्णवेळ अध्यापकांमधून एक अध्यापक;

(दोन) संबंधित विषयातील पदव्युत्तर अध्ययनक्रम देऊ करणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील किंवा पदव्युत्तर केंद्रांमधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापकांमधून दोन अध्यापक;

(तीन) संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील विभागप्रमुख नसलेले तीन अध्यापक.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार—ब, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दिनांक २८ एप्रिल, २०१७ अधिसूचना अन्वये विविध प्राधिकरणावर नामनिर्देशित करावयाच्या पात्रता व शर्ती जाहीर केल्या आहेत. त्यानुषंगाने अभ्यासमंडळावर नामनिर्देशित करावयाच्या सदस्यासंदर्भात पात्रता व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| (एक) | ४०(२)(ख)(एक) विद्यापीठ अध्यापक | कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशीत केलेला—<br>(क) संबंधित विषयातील एकूण किमान १० वर्षांच्या अध्यापनाच्या अनुभवासह पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |
| (दोन) | ४०(२)(ख)(दोन) संलग्न महाविद्यालयाचे पदव्युत्तर अध्यापक | कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशीत केलेला—<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ख) एकूण किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अथवा पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असावा,<br>(घ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.<br>(पान क्रमांक २ वर.....) |

Swami Ramanand Teerth Marathwada University Estt. 1994 Nanded

॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++' grade

## कुलगुरूंचे कार्यालय (Office of the Vice-Chancellor)

**Phone:** (02462) 215282 **Website:** www.srtmun.ac.in **E-mail:** vcoffice@srtmu.ac.in



| | | |
|---|---|---|
| (तीन) | ४०(२) (ख) (तीन) संलग्न महाविद्यालयांतील अध्यापक (विभागप्रमुख नसलेले) | कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशीत केलेला—<br>(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,<br>(ख) पदवीपूर्व स्तरावरील किमान १० वर्षाचा पदवीपूर्व अध्यापनाचा अनुभव असावा,<br>(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे. |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पात्र असणाऱ्या इच्छूक व्यक्तींनी नामनिर्देशन अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह **दिनांक २४ डिसेंबर, २०२२ पर्यंत प्रस्तुत विद्यापीठाच्या मा.कुलगुरू महोदयांच्या कार्यालयास सादर** करावेत.

टीप : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४०(२)(ख) तरतुदीनुसार, विविध अभ्यासमंडळावर नामनिर्देशन करण्यासंदर्भात प्रक्रिया राबविण्याचे तसेच नामनिर्देशन करण्याचे सर्वाधिकार हे मा.कुलगुरू महोदयांना प्राप्त आहेत. त्यामुळे नामनिर्देशनासंदर्भात अर्ज सादर केला या कारणास्तव अर्जदारास नामनिर्देशनाच्या जागेवर हक्क/दावा करता येणार नाही. एखाद्या व्यक्तीने अर्ज सादर केला नसेल, परंतु सदरील व्यक्ती त्या पदासाठी योग्य व पात्र आहे अशी धारणा मा.कुलगुरू महोदयांची झाल्यास त्या व्यक्तीचे नामनिर्देशन करण्यात येईल. नामनिर्देशनाबाबत प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याबाबत विद्यापीठाद्वारे कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा स्वीकारला जाणार नाही.

कृपया, सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

मा.कुलगुरू महोदयाचे कार्यालय

Swami Ramanand Teerth Marathwada University
Estt. 1994
Nanded